# QUANTUM OF FINANCIAL CONTRIBUTION

- संस्थेचे काम करण्यास कायदेशीर अपात्र ठरविले असल्यास, लेखी स्वरूपात राजीनामा दिलेला असेल आणि राजीनामा मंजूर झाला असेल तर, वैद्यकिय शारीरिक / मानसिक दृष्ट्या संस्थेचे काम करण्यास असमर्थ असल्यास व मृत्यू अथवा अन्य कोणत्याही वैध कारणास्तव सभासदत्व रद्द करण्यात येईल.

सभासदत्व रद्द करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

६) सभासदत्वाचे प्रकार:-या नियमावलीतील नियम क्रमांक ४ चे अधिन राहून सभासदांचे खालील प्रमाणे एकुण २ प्रकार असतील.

१. आजीव सभासद :-संस्थेस एकरकमी १००१/- (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र) देणाऱ्या वय वर्ष १८ वरील भारतीय व्यक्तीने नियम क्रमांक ४ च्या अधीन राहून अर्ज केल्यास संस्थेचा आजीव सभासद/कायमस्वरुपी सभासद म्हणून संबोधिले जाईल.सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीस अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस आजीव सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. ठरावान्वये या संस्था स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य आपोआपच संस्थेचे कायमस्वरुपी/आजीव सभासद समजले जातील. आजीव सभासदांना मतदानाचा तसेच निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार असेल.

२. सर्वसाधारण सभासद :-संस्थेकडे वार्षिक कालावधीसाठी वर्गणी/फी रुपये १०१/- (अक्षरी रुपये एकशे एक मात्र) भरणाऱ्या वय वर्ष १८ वरील भारतीय व्यक्तीने नियम क्रमांक ४ च्या अधीन राहून अर्ज केल्यास संस्थेचा सर्वसाधारण सभासद म्हणून संबोधले जाईल.सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस सर्वसाधारण सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. वार्षिक वर्गणी देणाऱ्या सभासदांना त्यांच्या सभासदत्वाच्या कालावधीतच मतदानाचा अथवा निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार असेल. मात्र ज्या सभासदांची संपूर्ण वर्गणी आलेली नाही अशा सभासदांना मत देण्याचा अधिकार अथवा निवडून येण्याचा अधिकार राहणार नाही.

३. सभासदांचे अधिकार - संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला व आवश्यकतेनुसार होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणे व निवडणुकीच्या वेळी मतदान करून संस्थेच्या कार्यामध्ये मदत व सहकार्य करणे.

७) वार्षिक सर्वसाधारण सभा तीची कार्ये:-

वार्षिक सर्वसाधारण सभा एप्रिल ते जुलै या कालावधीतच घेतली जाईल. या सभेत सर्व प्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील. सभेचे स्थळ, दिनांक वेळ,गणसंख्या,अजेंडा या बाबतची सूचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव/सेक्रेटरी

True Copy

Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Ch...,
Dist. Ratnagiri

Scanned with C...